**डॉ. नितीन करीर । दांडेकर पुलाच्या 'परिवर्तन' प्रकल्पातील १९२ सदनिकांचे झोपडपट्टीधारकांना हस्तांतर**

# प्रत्येक विकसकाने किमान एक एसआरए प्रकल्प हाती घ्यावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**सहकारनगर :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे ४० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या ही आज झोपडपट्टीमध्ये राहते. हे सारे नागरिक स्वखुशीने झोपडपट्टीत राहत नाहीत. शहराचे सामाजिक स्वास्थ्य सांभाळायचे असेल, तर याही नागरिकांना चांगले राहणीमान आणि सुविधा देणे आवश्यक आहे आणि याचसाठी खासगी विकसकांनी एसआरए प्रकल्पांकडे वळणे गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक खासगी विकसकाने किमान एक एसआरए प्रकल्प हाती घ्यावा, मत महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर यांनी व्यक्त केले.

पुण्यातील नाईकनवरे डेव्हलपर्सच्या 'परिवर्तन' या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे उद्घाटन व सदनिका ग्राहकांना सदनिका हस्तांतराचा कार्यक्रम आज डॉ. करीर यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते.

पुणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, क्रेडाई नॅशनलचे अध्यक्ष सतीश मगर, क्रेडाई महाराष्ट्रचे उपाध्यक्ष श्रीकांत परांजपे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील, पुणे महापालिकेचे सभागृहनेते श्रीनाथ भिमाले, मशाल संस्थेचे अध्यक्ष शरद महाजन, 'परिवर्तन' या प्रकल्पाचे वास्तुविशारद संदीप महाजन, नगरसेवक धीरज घाटे, स्मिता वस्ते, सरस्वती शेंडगे, परिवर्तन प्रकल्पातील सदनिकांचे मालक सलीम पटेल, शिवाजी पारिटे व शाहीद पटेल आदी यावेळी उपस्थित होते.



दांडेकर पुलाजवळील 'परिवर्तन' या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या सदनिकांचे वाटप सदनिकाधारकांना करण्यात आले. यावेळी डावीकडून प्रशांत वाघमारे, श्रीनाथ भिमाले, डॉ. नितीन करीर, सौरभ राव आणि सदनिकांचे मालक.

> क्रेडाई (कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडिया) व एमसीएचआय अर्थात महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री यांच्या सदस्यांनी किमान एक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हाती घेत शहराच्या विकासासाठी हातभार लावावा. आज बांधकामक्षेत्राची परिस्थिती तितकीशी चांगली नाही, याची मला कल्पना आहे. मात्र असे असले तरी तीन ते चार बांधकाम व्यावसायिक एकत्र येत एक एसआरए प्रकल्प हाती घेऊ शकतील. झोपडपट्टीमध्ये राहणारे नागरिकदेखील शहराच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहेत आणि आपणही या शहराचा भाग असून शहराच्या विकासात योगदान द्यायला हवे, अशी भावना याद्वारे त्यांच्या मनात निर्माण होईल.
>
> **- डॉ. नितीन करीर**

सर्व आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करूनच प्रकल्पाचे हस्तांतर आज केले गेले.

यावेळी प्रत्येक सभासदाशी स्वतंत्र करारनामा करण्यात आला असून अभिहस्तांतर प्रक्रियादेखील पार पडली. हस्तांतरापूर्वीच या सर्व बाबींची पूर्तता केलेला हा भारतातील एकमेव प्रकल्प ठरेल, त्यामुळे एसआरए क्षेत्रात एक नवा मापदंड प्रस्थापित होईल, असा विश्वास यावेळी हेमंत नाईकनवरे यांनी व्यक्त केला.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अर्थात एसआरएची स्थापना ही १४ वर्षांपूर्वी झाली. त्यावेळी क्रेडाईने मशाल या सामाजिक संस्थेच्या मदतीने शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये एक सर्व्हे केला गेला. त्याची एक पुस्तिकाही छापली गेली. मात्र त्या सर्व्हेनंतर एसआरएने याचे गणित मांडत ते विकसकांसमोर ठेवणे अपेक्षित होते.

मात्र तसे झाले नाही. विकसकाने एसआरए प्रकल्प आणल्यानंतर तो तपासत बसणे हे एसआरएचे काम नाही तर नागरिक व विकसक यांमध्ये त्यांनी पुलाचे काम करणे अपेक्षित आहे, असेही यावेळी डॉ. करीर यांनी नमूद केले.

हेमंत नाईकनवरे यांनी प्रास्ताविक केले. सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले. रणजित नाईकनवरे यांनी आभार मानले.